पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र
# कल्याणवार्ता
• अंक : २५ • डिसेंबर २०१२ • पृष्ठे ४
इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

**सरत्या वर्षाला निरोप देत नवी स्वप्न, नव्या आशा, नवी उमेद व नाविन्याची कास धरत नवीन वर्षाचं स्वागत करु. आपली सर्व स्वप्न, आशा, आकांक्षा पूर्ण होवोत या प्रार्थनेसह नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.**

## कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ८३-८४ चे शानदार उद्घाटन

सन २०१२-१३ सालामध्ये अनुक्रमे वर्ग ३ व ४ मधील सेवकांसाठी आयोजित कामगार प्रशिक्षण वर्ग क्र.८३-८४ चा उद्घाटन समारंभ दिनांक ७/१२/२०१२ रोजी जुने कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय इमारत, कसबा पेठ येथे पार पडला. सदर प्रशिक्षण वर्गास ५७ सेवकांना प्रवेश देण्यात आला आहे. वर्ग क्र. ८३ साठी श्री. मधुकर बिबवे



व वर्ग क्र. ८४ साठी श्रीमती उषा आल्हाट यांची कामगार शिक्षक म्हणून तर समन्वयक म्हणून कामगार कल्याण अधिकारी श्री. नितीन केंजळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कार्यक्रमास कामगार क्षेत्रातील जेष्ठ विचारवंत व समर्थ भारत व्यासपीठाचे निमंत्रक, मा. मुकुंदराव गोरे उद्घाटक म्हणून लाभले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मा. शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार) यांच्या हस्ते आद्य कामगार नेते कै. नारायण मेघाजी लोखंडे यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

मा. शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार) यांनी आपल्या प्रास्तावनेत प्रशिक्षणार्थींना कामगार प्रशिक्षण योजनेबाबतची माहिती दिली. तसेच, त्यांनी वैयक्तिक जीवनातील शिस्तीचे महत्व सोदाहरण स्पष्ट केले. तसेच, प्रशासन कर्मचाऱ्यांना कामगार प्रशिक्षणासाठी कार्यालयीन वेळेमध्ये सवलत देते, आर्थिक खर्च करते याची सर्व प्रशिक्षणार्थींनी दखल घेवून चांगल्या प्रकारे प्रशिक्षण घेणे व त्याचा सदुपयोग आपल्या दैनंदिन कामकाजामध्ये करणे आवश्यक असल्याचे नमूद करुन सर्व प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करण्याबाबत शुभेच्छा दिल्या.

प्रशिक्षणार्थींना पुणे महानगरपालिका कामगार युनियनचे कार्याध्यक्ष, श्री. प्रकाश जाधव व पीएमसी एम्प्लॉईज युनियनचे श्री. तुकाराम जगताप यांनी मार्गदर्शन केले. श्री. जगताप यांनी बऱ्याच वर्गांवर कामगार शिक्षक म्हणून काम केले असल्याने कामगार प्रशिक्षण वर्ग व शैक्षणिक दौऱ्यांचे यशस्वीरित्या नियोजन कसे पध्दतीने केले पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले. त्याबरोबरच कामगार प्रशिक्षणामध्ये आलेले अनुभव त्यांनी विषद केले.

तदनंतर प्रमुख पाहुणे मा. मुकुंदराव गोरे यांनी आपल्या भाषणामध्ये पुणे महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणारा कामगार प्रशिक्षण वर्ग हा उपक्रम स्तुत्य असल्याचे नमूद करुन प्रशिक्षण कार्यक्रम यापुढेही सुरु ठेवणेबाबत सदिच्छा व्यक्त केल्या. कामगारांनी फक्त आपले कुटुंबच नव्हे तर आपली संस्था, आपला देश समर्थ बनविण्यासाठी कसोशिने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाने आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक कर्मचाऱ्याने स्वयंस्फूर्तीने काम केल्यास नागरी समस्या सोडविण्यामध्ये मोठी मदत होणार आहे, असे नमूद करुन ज्याप्रमाणे द्वितीय महायुध्दामध्ये जे देश नामशेष झाले त्यांनी श्रमशक्तीच्या जोरावर अत्यंत कमी कालावधीमध्ये प्रगती करुन आपल्या देशाची नावे अग्रगण्य करण्यामध्ये मोलाचा वाटा उचलला आहे. त्याप्रमाणेच भारतीय नागरिकांनी व कामगारांनी श्रमशक्तीचा योग्य वापर केल्यास भारत देश हा प्रगतीपथावर आल्याशिवाय राहणार नाही, अशा भावना व्यक्त केल्या. तसेच, कामगार प्रशिक्षण वर्गामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या सर्व कामगारांना कामगार प्रशिक्षणाबाबत शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती तनुजा रावळ, कामगार शिक्षिका यांनी केले व आभारप्रदर्शन श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी केले.

## कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाकडील अधिकाऱ्यांची तत्परता व कर्मचाऱ्यांचा प्रामाणिकपणा

पुणे महानगरपालिकेच्या कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाकडील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा प्रामाणिकपणा निदर्शनास आणणारी घटना नुकतीच घडली. दिनांक २८/१२/२०१२ रोजी नेहमीप्रमाणे घंटा ट्रक कचरा गाडी घराघरातील कचरा गोळा करण्यासाठी गेली होती. सदर घंटागाडीमध्ये ८६३/६४, शोध घेण्यास सांगितले. यानंतर मोकादम श्री. रविंद्र लोंढे, श्री. किसन गायकवाड, श्री. भिमा लोंढे व श्री. राजेंद्र आदमाने व इतर बिगारी कर्मचारी यांनी सदर गाडीतील कचरा अक्षरशः निवडून दागिन्यांची पुरचुंडी शोधून काढली व श्रीमती हुलावळे यांना परत करण्यात आली.



भिमा लोंढे



राजेंद्र आदमाने



रविंद्र लोंढे



किसन गायकवाड

बुधवार पेठ येथील सौ. मेघा राम हुलावळे यांनी कचरा टाकला. कचऱ्यासोबत घाईगडबडीत नजरचुकीने दागिन्यांची पुरचुंडी घंटा ट्रकमध्ये टाकली गेली. यामध्ये अंदाजे तीन तोळ्याचे दागिने होते. ही बाब सदर महिलेच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी ही गोष्ट माजी नगरसेवक मा. विजय मारटकर व महापालिका सहाय्यक आयुक्त श्री. अरुण खिलारी यांच्या कानावर घातली. परिस्थितीचे गांभीर्य विचारात घेवून श्री. खिलारी यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना कचरागाडीतील कचऱ्यामध्ये दागिन्यांचा

श्रीमती हुलावळे यांनी सर्व कामगारांचे तसेच मा.विजय मारटकर, मा.प्रतिभाताई ढमाले, नगरसेविका व मा.अरुण खिलारी, महापालिका सहाय्यक आयुक्त व आरोग्य निरीक्षक श्री. राजेश आहेर यांचे आभार मानले. त्याच दिवशी झालेल्या प्रभाग समिती बैठकीत अध्यक्ष मा.दिलिप काळोखे यांनी सर्वांचे अभिनंदन करणारा ठराव मांडला.त्यास सर्व सभासदांनी एकमुखी मान्यता दिली.

## पुणे महानगरपालिकेत सेवक निवृत्त दिन साजरा

पुणे महानगरपालिकेतर्फे निवृत्त सेवक दिनानिमित्त पुण्यातील शासकीय, निमशासकीय व महानगरपालिकेतील निवृत्त सेवकांसाठी रविवार दिनांक ३० डिसेंबर, २०१२ रोजी चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी उपमहापौर मा. दिपक मानकर यांनी निवृत्त सेवक संघाच्या ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. निवृत्त सेवक दिनानिमित्त सन २००२ पासून दिल्या जाणाऱ्या कै.द.दा.ओरपे स्मृति पुरस्काराचे वाटपही मा. दिपक मानकर, उपमहापौर यांचे हस्ते करण्यात आले. कै. द.दा.ओरपे स्मृती पुरस्कार दरवर्षी महापालिकेतर्फे होणाऱ्या एल.एस.जी.डी. व एल.जी.एस. या परीक्षांमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येतो. या वर्षी सन २०१२ साठी एल.एस.जी.डी. परीक्षेत प्रथम आल्याबद्दल महापालिकेतील उच्चश्रेणी लघुलेखक या पदावर काम करणाऱ्या श्री. सुरेश तुकाराम परदेशी तर एल.जी.एस. परीक्षेत प्रथम आल्याबद्दल ज्युनिअर ग्रेड लेखनिक पदावर कार्यरत असणाऱ्या श्री. देवू मारुती आग्रे यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विविध सेवानिवृत्त संघटनांचे प्रतिनिधी व सभासद उपस्थित होते. या वेळी बोलताना उपमहापौर मा. दिपक मानकर यांनी पुढील वर्षापासून बक्षिसाची (पुरस्काराची) रक्कम तसेच पुरस्कारार्थींची संख्या वाढविण्याचे आश्वासनही दिले. तसेच, निवृत्त सेवकांपैकी ८० वर्षांपुढील ज्येष्ठांच्या आरोग्याची जबाबदारी घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. कै. द.दा.ओरपे स्मृती पुरस्कार दोन व्यक्तींऐवजी पाच व्यक्तींना देण्यात यावा, अशी सूचना या वेळी बोलताना त्यांनी केली.

या कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या ज्येष्ठ सेवानिवृत्त सभासदांनी आपली मते व्यक्त केली व हा कार्यक्रम सर्व सेवकांना एकत्र आणण्याचे काम करतो असेही प्रतिपादन केले. श्री. दत्तात्रय भालेराव यांनी आभारप्रदर्शन करुन कार्यक्रमाची सांगता केली.

संपादकीय...

# नेतृत्व (Leadership)

कोणत्याही संस्थेच्या एकूण कामकाज प्रक्रियेत संचालन व दिग्दर्शनाबरोबर नेतृत्व अत्यंत महत्वाचा घटक आहे. कोणत्याही समूहाने केलेल्या कामात समन्वय साधणे किंवा त्याचे नियंत्रण करण्याचे काम व्यवस्थापकाचे असते. विशिष्ट उद्देश सफल होण्यासाठी विविध व्यक्तींच्या प्रयत्नांना योग्य दिशा देण्यासाठी व्यवस्थापन ही एक अत्यावश्यक प्रक्रिया आहे. दिग्दर्शन, प्रोत्साहन आणि समन्वय या प्रक्रियांची अंमलबजावणी करताना संघटनात्मक कौशल्य, प्रशासकीय चातुर्य, परिणामकारक नियोजन, प्रशासकीय समज, व्यक्तिगत पुढाकार आणि गतिमानता हे गुण व्यवस्थापक, अधिकारी, प्रशासक आणि पर्यवेक्षक यांचे अंगी असणे आवश्यक आहे. या सर्व गुणांचा समावेश नेतृत्व या संकल्पनेत केलेला आहे.

नेतृत्वाच्या संकल्पनेत काळाच्या ओघात पुष्कळ बदल घडत गेलेले आहेत. सुरुवातीला नेतृत्वाबाबतच्या कल्पनांचा रोख हा व्यक्तिगत योग्यतेकडे होता. त्या वेळी अशी समजूत होती की कुठल्याही नेत्यामध्ये कोणती तरी अद्वितीय शक्ती असते. बराच काळ गेल्यानंतर आधुनिक दृष्टिकोनानुसार नेतृत्व या शब्दाचा अर्थ अधिक तर्कसंगत व वैचारिक पातळीवर आधारलेला दिसून येतो. एखादी व्यक्ति, समूह, संस्था यांचे यश व परिणामांसाठी नेतृत्व आवश्यक असते. नेतृत्वामध्ये व्यक्तिची किंवा संस्थेची अव्यक्त किंवा सुप्त क्षमता प्रत्यक्षात आणल्या जातात. नेतृत्व हा एक गुण असून त्यामुळे एक व्यक्ति संपूर्ण समूहास पूर्वनियोजित ध्येयाकडे नेवू शकते. ज्या व्यक्तिंना व्यवस्थापकीय कार्य करावयाचे असते त्यांना कनिष्ठांवर प्रभाव पाडण्यासाठी यशस्वी नेता होणे आवश्यक असते. त्यामुळे नियोजित ध्येय साध्य करण्याकरिता त्यांना उत्स्फूर्तपणे कार्यप्रवृत्त केले जाते. व्यवस्थापकामध्ये मार्गदर्शन, दिग्दर्शन व नियंत्रण हे गुण असल्यास त्यांचेवर सोपविलेले कार्य ते आपल्या कनिष्ठांकडून सहजपणे करुन घेवू शकतात, त्यांनाच व्यवस्थापनामध्ये नेतृत्व असे म्हणतात.

नेतृत्व ही एक प्रक्रिया असून लोकांवर प्रभाव टाकून व त्यांना प्रोत्साहन देवून मनुष्यबळाचे रुपांतर एका मोठ्या दलामध्ये करुन त्यांच्या सहाय्याने पूर्वनियोजित ध्येय साध्य करणे शक्य होते. नेतृत्वास व्यवस्थापनामध्ये निर्णयात्मक भूमिका पार पाडावी लागते. त्यामुळे नेत्याचे कर्तव्य निश्चितपणे विधायक आणि स्फूर्तीदायक असावे लागते. त्यामुळे सहकाऱ्यांचे प्रयत्न आणि शक्ती यांना प्रोत्साहन मिळून योग्य दिशेने वाटचाल होवू शकते.

कुठल्याही नेत्याने प्रत्येक काम करताना जागरुक राहून योग्य ती काळजी घ्यायला हवी. कारण त्याचा परिणाम अनुयायांच्या वर्तणुकीवर होत असतो. क्रेच आणि क्रच यांच्या मतानुसार नेता हा नैतिकतेच्या प्रश्नांशी निगडित असतो. त्यामुळे अनुयायांची नैतिकता वाढविणे ही त्याची जबाबदारी असते. त्यामुळे नेत्याच्या चांगल्या वर्तणुकीचा सुयोग्य परिणाम अनुयायांवर होत असतो. नेता दृढ व निश्चयी असावा. त्याने अनुयायांचे म्हणणे ऐकून त्यावर विचार करावा आणि प्रसंगी स्विकारही करावा. नेहमी स्वत:च्या वेगळ्या विचारांचा आग्रह धरताना संस्था व सर्व समूहाचे हित पाहून कनिष्ठांच्या सूचनांचा विचार करणे या बाबी नेतृत्व टिकविण्यासाठी आवश्यक आहेत. त्याचप्रमाणे नेत्याने अनुयायांच्या न्याय्य व योग्य इच्छेला मान देणे आवश्यक असते.

कोणत्याही नेत्यात जन्मजात गुण नसतात. त्याला स्वत:चा विकास स्वत:च करावा लागतो आणि काही कौशल्ये प्राप्त करुन घ्यावी लागतात. सर्व प्रकारच्या लोकांचे सर्व परिस्थितीत नेतृत्व करणे यासाठी कुठलाही एक गुण उपयोगी पडत नाही. त्यासाठी प्रत्येक परिस्थितीचा साकल्याने विचार करुन त्यानंतर कोणता मार्ग स्विकारावा याचा निर्णय नेत्यास घ्यावा लागतो. म्हणूनच नेत्याने परिस्थितीची जाण ठेवून सामाजिक प्रश्नांचा गांभीर्याने व साकल्याने विचार करुन योग्य त्या उपाययोजना करणे चांगल्या नेत्याचे लक्षण आहे.

सर्वसाधारणपणे नेतृत्वाचे दोन प्रकार आहेत १) राजकीय नेतृत्व २) प्रशासकीय नेतृत्व. प्रशासकीय नेतृत्वाबाबत अधिक विचार करावयाचा झाल्यास संस्थेत काम करणारे अधिकारी, पर्यवेक्षक, व्यवस्थापक इत्यादी नेतृत्वाच्या कार्यकक्षेत येतात. अशा प्रकारच्या नेत्यामध्ये सामान्य समज आणि तर्कसंगत विचारसरणी असावी. कठिण परिस्थितीला तोंड देण्यासाठी आत्मविश्वास असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कामगारांत विश्वास निर्माण करणेसाठी त्यांची मते जाणून घेणे, त्यांच्या अडचणी सोडविणे, त्यांच्या न्याय्य व योग्य सूचनांचा आदर करणे, इत्यादी बाबी आवश्यक आहेत. शेवटी कर्मचाऱ्यांचे दृष्टिकोन आणि दूरदृष्टी यांची पातळी उंचावून त्यांच्या कामाचा संख्यात्मक आणि गुणात्मक दर्जा उंचावणे ही सुध्दा नेत्याचीच जबाबदारी असते. अर्थातच त्यासाठी नेत्याजवळ विशिष्ट पात्रता व अनुयायांना प्रवृत्त करण्यासाठी विशेष क्षमता असावी लागते. या गुणांशिवाय कर्मचाऱ्यांची नेत्याकडून मित्र, मार्गदर्शक व सल्लागार या भूमिकेची अपेक्षा असते. अशा वेळी न्याय्य व योग्य गोष्टींसाठी जो नेता सहकाऱ्याबरोबर राहून त्यांच्या अयोग्य गोष्टींचे त्यांना वेळोवेळी जाणीव करुन देतो व उत्तम गोष्टींसाठी प्रोत्साहन देतो त्याच नेत्याचे नेतृत्व यशस्वी ठरते.

# ओळख गुणवंताची-श्री.संजय निवृत्ती घावटे

ओळख गुणवंताची या सदरात आपण श्री. संजय निवृत्ती घावटे, आरोग्य निरीक्षक यांची ओळख करुन घेणार आहोत. श्री. संजय निवृत्ती घावटे यांचा जन्म खडकी येथे झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण खडकी येथील कॅन्टोमेंट बोर्डाच्या शाळेत झाले. अभ्यासात हुशार असूनही खेळकर वृत्तीमुळे अभ्यासात दूर्लक्ष होत गेले व त्याचा परिणाम म्हणजे दहावीच्या परीक्षेत टक्केवारी कमी मिळाली. खडकी येथील आलेगावकर ज्युनिअर कॉलेजमध्ये वाणिज्य शाखेतून बारावी उत्तीर्ण झाले. पदवी शिक्षण सर परशुराम महाविद्यालयात पूर्ण केले. सदर कॉलेजला सायकलवर जावून त्यांनी शिक्षण पूर्ण केले.

घरातील आर्थिक स्थिती अडचणीची असल्यामुळे आवड असूनही त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही. घरखर्चास हातभार लावण्यासाठी श्री. घावटे व त्यांचे भाउ खाजगी कंपनीत कामास जाउ लागले. श्री. घावटे यांचे वडिल ॲम्युनिशन दारुगोळा फॅक्टरी येथे चार्जमन या पदावर कामास होते. त्यांच्याआकस्मिक निधनाने रिक्त झालेल्या जागी नोकरीसाठी त्यांनी मोठ्या भावाला अर्ज करण्यास प्राधान्य दिले. त्यावेळच्या पगारात कुटुंबाचे भागत नसल्याने श्री. घावटे यांनी नोकरीबरोबरच जनरल इन्शुरन्स कंपनीची एजन्सी घेतली. तसेच, आरटीओ एजन्टचे काम देखील केले. मोठा भाउ ॲम्युनेशन फॅक्टरी येथे सुपरवायजर म्हणून रुजू झाल्यामुळे श्री घावटे यांना पुढील शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. त्यांनी बहिस्थ एम.कॉम. चे शिक्षण पूर्ण केले. सेवायोजन कार्यालयामार्फत पुणे महानगरपालिकेत सुरक्षा रखवालदार या पदाकरिता कॉल आला व दिनांक ६/८/१९९३ रोजी पुणे महानगरपालिकेत ते रुजू झाले. श्री. घावटे यांचे एम.कॉम.पर्यंत शिक्षण झालेले असल्याने रखवालदारीचे काम करणे त्यांना खटकत होते. त्यामुळे पुणे महानगरपालिकेत विविध अभ्यासक्रम व कोर्सेस यांची माहिती घेवून ते जिद्दीने अभ्यास करत राहिले. दरम्यानच्या काळात सुरक्षा विभागात ३-४ महिन्यांकरिता ज्युनिअर ग्रेड लेखनिक सुट्टीवर असल्याने श्री. घावटे यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेवून मुख्य सुरक्षा अधिकारी मा.ल.मा.कोंढरे व सुरक्षा अधिकारी मा. आर.के.कोळेकर यांनी ऑफिस कामाकरिता त्यांना बोलविले. श्री. घावटे यांनी सुरक्षा विभागातील विविध कामांची माहिती करुन घेतली. तसेच संगणकावर पगारबिलाचे काम करु लागले. सुरक्षा विभागात असतानाच सॅनिटरी इन्स्पेक्टर, एल.एस.जी.डी., एमएससीआयटी, तसेच मराठी व इंग्रजी टंकलेखनाची परीक्षा ते उत्तीर्ण झाले.

दिनांक ८/६/२००४ रोजी श्री. घावटे यांची आरोग्य निरीक्षक या पदावर नियुक्ती झाली. सामाजिक क्षेत्रात कामाची आवड असल्याने विविध मंडळे, कार्यकर्ते, संघटना प्रतिनिधी, मा. सभासद व अधिकारी वर्गाशी जवळीस साधून आरोग्य खात्याच्या कामकाजाविषयी नागरिकांना माहिती समजावून सांगण्याचा प्रयत्न ते करत आहेत. आरोग्य कोठीतील कामगारांचे विविध



प्रश्न, अडचणी समजावून घेवून वेळोवेळी त्यांना विविध योजना, साक्षरता अभियान, घनकचरा व्यवस्थापनाबाबतचे मार्गदर्शन ते करतात. संगमवाडी क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत असताना श्री.घावटे यांनी पुणे स्वच्छ सेवा सहकारी संस्थेचे प्रतिनिधींची बैठक घेवून कचरावेचकांची नेमणूक केली. या परिसरातील सोसायट्यांमधील सभासदांशी सविस्तर चर्चा करुन टिंगरेनगर परिसरातून वॉर्ड कंटेनरमुक्त केला. कचरावेचकांकरिता कलेक्टींग पॉईंट करुन ओला व सुका कचऱ्यासाठी स्वतंत्र घंटागाडीची व्यवस्था केली. वॉर्ड कंटेनरमुक्त करणेची सुरुवात पुणे शहरात प्रथम याच वॉर्डमधून झाली.

पर्यावरणाविषयी युवकांमध्ये जनजागृतीसाठी पथनाट्य, रांगोळी, निबंध, स्वच्छ परिसर स्पर्धांचे आयोजन श्री. घावटे यांनी केले. मनपा सेवक, कचरावेचक तसेच शालेय विद्यार्थ्यांकरिता ते आरोग्य, नेत्र, त्वचारोग निदान शिबीरे आयोजित करीत आहेत. विविध संसर्गजन्य रोग डेंगू, मलेरिया, चिकनगुनिया, स्वाईन फ्ल्यू, पल्स पोलिओ व त्यावरील नियंत्रण करण्यासाठी मोफत खाजगी डॉक्टरांची मदत घेतली. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील स्वच्छता, देखरेख व सेवकांना मोफत जेवणाची व्यवस्था स्थानिक मंडळामार्फत करुन देण्याचे काम ते गेली आठ वर्षांपासून करीत आहेत. सन २००५-०६ या काळात शांतीनगर, फुलेनगर परिसरात पूरग्रस्तांना विविध मंडळे व संस्था यांचेमार्फत अन्न, वस्त्र व निवाऱ्याची व्यवस्था करण्यात त्यांनी मदत केली. सार्वजनिक स्वच्छता, प्लॅस्टिक कॅरीबॅग बंदी, पिण्याच्या पाण्याचा गैरवापर, जैविक कचरा कंटेनरमध्ये टाकणे, राडारोडा व इतर दंडात्मक कारवाईमध्ये श्री घावटे यांचा मोठा सहभाग आहे. प्रथमत: पुणे शहरात सन २०१० साली मॉलसमधील प्लॅस्टिक पिशव्या जप्तीची कारवाई श्री. घावटे यांनीच केली. सन २०१२ साली प्लॅस्टिक कॅरीबॅग जप्तीमध्ये रु. १०,०००/- चे प्रशासकीय शुल्क वसुल केले. येरवडा क्षेत्रीय कार्यालयाकडील कचरा हस्तांतर केंद्र या ठिकाणी सेवकांना पर्यावरणविषयी मार्गदर्शन करुन वृक्ष दत्तक योजना राबवून वृक्षारोपण केले.

श्री. घावटे यांना समाज कार्याची आवड असल्याने नोकरी करत असतानाच समाज कार्यात मोलाची कामगिरी केली आहे. या जाणिवेतून व समाजसेवी संस्थांच्या माध्यमातून जागतिक एड्स दिनानिमित्त एड्स जनजागृती रॅली दरवर्षी काढण्यात येते. गरजू, गरीब शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले जाते, आरोग्य शिबीर घेतले जाते. अंध दांपत्यांच्या विवाह प्रसंगी मदत केली जाते. श्री. घावटे यांनी दिनांक ४/१०/२०१० रोजी धानोरी येथील अंबानगरी सोसायटीजवळील रस्त्यावर साफसफाई करीत असताना रस्त्याच्या कडेला सापडलेली श्री. शहा यांची हरवलेली रक्कम रु. ४ लाखाची बॅग प्रामाणिकपणे कोणतेही बक्षिस न घेता त्यांच्या स्वाधीन केली.

क्षेत्रीय कार्यालयात आरोग्य निरीक्षकाचे काम करीत असताना सह आयुक्त मा. ज्ञानेश्वर मोळक, मा. सुरेश जगताप, वैद्यकीय अधिकारी मा. डॉ. सुनिल आंधळे, डॉ. रेखा लबडे, डॉ. अशोक आहेर, डॉ. माया लोहार, डॉ. दिनेश बेन्डे, विभागीय आरोग्य निरीक्षक श्री. शिवाजी सपकाळ, नानासाहेब बोबडे यांचे श्री. घावटे यांना बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन मिळाले.

पुणे मनपाचे वरं जनहितं ध्येयम् हे ब्रिदवाक्य सार्थ करण्यासाठी आपल्या नियंत्रणाखालील सेवकांनी जास्तीत जास्त परिश्रम घेतले पाहिजेत, तसेच नागरिकांना समाधान मिळेल असे काम केले पाहिजे, दिलेले काम नियोजित वेळेत पूर्ण केले पाहिजे असे श्री. घावटे यांना वाटते. कोणत्याही संस्थेचे यश काम करणाऱ्या कुशल व आदर्श सेवकांवर अवलंबून असते. स्वच्छ पुणे सुंदर पुणे संकल्पना ठेवून सार्वजनिक स्वच्छता मोहिम राबवून पुणे शहर आदर्श कसे होईल यासाठी श्री. घावटे प्रयत्नशील राहणार आहेत.

श्री.घावटे यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे सन २०१०-११ मध्ये त्यांची गुणवंत कामगार पुरस्कारासाठी निवड करण्यात आली व जेष्ठ समाजसेवक मा.भाई वैद्य यांचे हस्ते गुणवंत कामगार पुरस्कार देवून त्यांचा गुणगौरव करण्यात आला. यापुढेही अशाच प्रकारे अधिक चांगली कामे करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. श्री. घावटे यांच्या पुढील कारकिर्दीसाठी कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

## राजीव गांधी ई-लर्निंग शाळा इमारतीस गुणवत्ता पुरस्कार प्रदान

पुणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी ई-लर्निंग शाळा इमारतीस उत्कृष्ट बांधकामासंदर्भात पुरस्कार प्रदान करण्यात आला. हॉटेल ली मेरिडियन येथे पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न झाला. गौरवचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप होते.

जयदीप राजे यांचे हस्ते पुस्कार वितरण करण्यात आले. पुणे महानगरपालिकेच्या वतीने अधिक्षक अभियंता संदीप खांडवे, राहुल साळुंके व वास्तुरचनाकार आनंद उपळेकर यांनी पुरस्कार स्विकारला.

या प्रसंगी पुण्यातील बांधकाम व्यावसायिक, वास्तुरचनाकार, औद्योगिक क्षेत्रातील विविध मान्यवर तसेच शासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बांधकाम क्षेत्राशी निगडित तज्ञ असलेल्या ९ नामवंत व्यक्तिंचा परीक्षण समितीत सहभाग होता. सदर समितीने गतवर्षात पूर्ण केलेल्या व कामे चालू असलेल्या पुण्यातील विविध शासकीय इमारतींची पाहणी केली.

पाहणी अंतर्गत करण्यात आलेल्या निकषांमध्ये पुणे महानगरपालिकेची राजीव गांधी ई-लर्निंग शाळा हा प्रकल्प उत्कृष्ट ठरला. यामध्ये शाळेचे नियोजित वेळेपूर्व बांधकाम, बांधकामाचा दर्जा, उत्कृष्ट गुणवत्ता व उत्कृष्ट आरेखन (डिझाइन) या निकषांवर आधारित राजीव गांधी ई-लर्निंग शाळा प्रकल्प उत्कृष्ट ठरल्यामुळे गुणवत्ता पारितोषिक पुणे मनपास प्रदान करण्यात आले.

## गरजेनुरुप व सतत प्रशिक्षण योजनेंतर्गत व्याख्याने

दिनांक ९/१२/२०१२ रोजी सुरु झालेल्या कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ८३ व ८४ मध्ये पुढील व्याख्यात्यांनी विविध विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. प्रा. आदरकर रविकांत - संवाद कौशल्य, श्री. संदीप कोळपे- नागरवस्ती विकास योजना, जेंडर बजेट, श्री. विजय कांबळे - वैयक्तिक/सामुहिक शिस्तीचे महत्व, श्री. दिलावर आवटी - वैद्यकीय सहाय्य योजना/सर्वांसाठी आरोग्य, श्री. प्रकल्प गुंजाळ - संगणक आणि आपण एचआरडी, श्री. दिपक कुलकर्णी - मनपा सेवा विनियम, श्री. राजेंद्र शेलार - भारतीय राज्यघटना, श्री. नितीन केंजळे - कामगार कल्याण योजना, श्री. लिलाधर वाबळे - संगणकीकरण आधुनिक पध्दती, श्रीमती शिलाताई डावरे - प्रशिक्षणातील महत्वाची केंद्रे, श्री. सुजन राज - कचरा विरहित पुणे शहर, श्री. चंद्रसेन जगताप - परस्परातील आंतरसंबंध, श्री. चंद्रकांत गमरे - कुटुंबाचे अंदाजपत्रक, श्री. सुधाकर साळुंके - नोटिंग ड्राफ्टींग - सहागठ्ठे पध्दती, श्री. इसाक शेख - अनुपस्थितीचे परिणाम, श्री. विठ्ठल काटे - हास्यकला जीवनशैली, श्री. महाजन - आपत्ती व्यवस्थापनाचे महत्व, श्री. मंडवाल - गृहबांधणी / संगणक कर्ज मनपाचे, श्री. संजय मोरे - जनता संपर्क महत्व, श्री. प्रशांत एडवी - प्रादेशिक केंद्र मनपा, श्री. शिवाजी गोखले - स्वातंत्र्योत्तर कामगार चळवळ, श्रीमती शिल्पा बेळे - महिला जागृती, श्री. बाळासाहेब जाधव - पुणे मनपामधील युनियन, श्री. वेल्हाळ - अंधश्रध्दा, डॉ. वैशाली जाधव - स्त्रीभृण हत्या एक समस्या, श्री. मोरे - गुंतवणुकीचे महत्व, श्री. मधुकर बिबवे- राज्यसरकारच्या योजना.

## क्रीडा स्पर्धेत महिला गटात पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळ विजेते



पुणे व पिंपरी चिंचवड शहर शिक्षण विभागमार्फत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेत महिला गटात थ्रो बॉल स्पर्धेमध्ये पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळ विजेते ठरले.

स.प.महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत थ्रो बॉल या प्रकारात पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या संघाने बालभारती संघाचा पराभव केला. शिक्षण मंडळाचे संघामध्ये कर्णधार सौ. स्वाती गायकवाड, तसेच श्रीमती प्रभा पाध्ये, सौ. कामिनी लंके, सौ. योगिता खेडकर, सौ. पोर्णिमा राठोड, कु. मृणाल भसाळे, श्रीमती मोनिका रावडे, सौ. दिपावली गायकवाड यांनी भाग घेतला. शिक्षण मंडळाच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

तसेच,महिला गटात बॅडमिंटन या खेळ प्रकारात पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळ विजेते ठरले.

स.प.महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत बॅडमिंटन या प्रकारात पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या सा.शि.संघटक सौ. स्वाती गायकवाड यांनी प्रथम क्रमांक मिळविला. तसेच, सौ. पोर्णिमा राठोड यांनी ४० वर्षांवरील वयोगटात तिसरा क्रमांक मिळविला.



स्वाती गायकवाड



पौर्णिमा राठोड

## शेवटच्या सहामाहीत सेवानिवृत्ती वेतनासाठी घ्यावयाची दक्षता

सेवानिवृत्त होणाऱ्या महापालिका सेवकाने सेवाकालातील शेवटच्या सहा महिन्यांमध्ये खालीलप्रमाणे दक्षता घ्यावी.

१. सेवापुस्तकातील सर्व नोंदी परिपूर्ण व अद्ययावत करुन घ्याव्यात.

२. सेवापुस्तकातील सर्व नोंदींवर खातेप्रमुखांच्या स्वाक्षऱ्या असल्याची खातरजमा करावी.

३. सेवापुस्तकानुसार शिल्लक रजा किती आहे याची खातरजमा करुन त्यानुसार रजा उपभोगाव्यात.

४. पुणे म्युनिसिपल सर्व्हंटस कोऑपरेटीव्ह बँक, गणेश सहकारी बँक, पुणे मनपा सेवक ग्राहक भांडार यांचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे.

५. महापालिकेच्या सदनिकां मध्ये रहात असल्यास थकबाकी बाबतचा दाखला उपलब्ध करुन घ्यावा.

६. वाहन कर्ज, घर बांधणी कर्ज, संगणक खरेदी कर्ज, इत्यादींचे हिशेब पूर्ण करुन तसे संबंधित खात्याचे दाखले घ्यावेत व त्याची नोंद सेवापुस्तकात करुन दाखल्याची एक प्रत सेवापुस्तकामध्ये जोडावी.

७. सेवकाने त्याच्या ताब्यात असलेली प्रकरणे, वस्तु वा तदनुषंगिक साधनसामग्रीची तपशिलवार ताबा यादी करावी.

८. बँकेत जामिनदार असल्यास त्याचा बोजा कमी करावा.

९. निवृत्तीपूर्व चार महिने भविष्य निर्वाह निधीची वर्गणी बंद करुन अंतिम बिल करणेसाठी संबंधित खात्यामध्ये अर्ज करावा.

१०. सेवानिवृत्तीनंतर वैद्यकीय सहाय्य योजनेचा लाभ मिळणेकामी विहित फॉर्ममध्ये सेवानिवृत्तीनंतर लगेचच अर्ज करुन सदस्यत्व घ्यावे.

१२. पेन्शन विक्रीचा अर्ज सेवानिवृत्तीनंतर लगेचच खातेप्रमुखांकडे स्वत: सादर करावा व पोहोच सांभाळून ठेवावी.

**पगारपत्रक लेखनिकांनी घ्यावयाची दक्षता**

१. सेवक सेवानिवृत्त होण्यापूर्वी एक वर्ष अगोदर पेन्शन प्रकरण सुरु करावे.

२. पेन्शन विभागाकडील प्राथमिक तपासणी व मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाकडील अंतिम तपासणीकामी आक्षेपांची हातोहात पूर्तता करुन प्रकरण निकाली काढावे.

३. सन १९७६, १९८६ व १९९६ या वेतन आयोगामुळे सुधारित वेतनश्रेण्यांच्या नोंदी, वेतन निश्चितीकरण अगोदरच तपासून बरोबर असल्याची खात्री करुन घ्या.

४. जोपर्यंत संबंधित प्रकरणी पी.पी.ओ.नंबर प्राप्त होत नाही तोपर्यंत सदर प्रकरण विभागाकडे प्रलंबित आहे हे लक्षात घेवून दक्षतापूर्वक कार्यवाही करावी.

५. सेवानिवृत्त सेवकांनी नियत दिनांकास निवृत्तीवेतन व देय रकमा देणे बंधनकारक आहे. या अनुषंगाने शासनाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार विलंबाने देण्यात येणाऱ्या रकमांवर व्याज देण्याची व प्रकरणी संबंधिताच्या वेतनातून वसुलीची तरतुद आहे.

६. आपण स्वत:च महापालिकेच्या सेवेतून निवृत्त होत आहोत व आपणास वेळेत सेवानिवृत्ती वेतन मिळावे, या भावनेतून सेवानिवृत्त वेतन प्रकरणी पाठपुरावा करावा.

७. याबाबत काही मार्गदर्शन, सहकार्य हवे असल्यास सल्लागार (कामगार) कार्यालय व पुणे मनपा सेवानिवृत्त संघाच्या पदाधिकाऱ्यांशी दर बुधवारी सल्लागार (कामगार) सुविधा केंद्रात ११ ते ५ या कालावधीत संपर्क साधावा.

## परिवर्तन करणारे उपाय

१. तुमच्या भोवती सर्व माणसे तुमच्या सारखी आहेत. तुम्हाला जर स्वत:विषयी प्रेम वाटत असेल तर तुमच्याभोवती जी काही माणसे आहेत, ती तुम्हाला आवडली पाहिजेत.

२. गरज असेल तेथे तुम्ही मदतीला धावत असाल तर तुमच्या कुटुंबात, मित्रमंडळीत, सर्व परिवारातील आवडती व्यक्ती होऊ शकाल.

३. तुमच्या मनात व अंतरंगात सतत सळसळता उत्साह भरलेला असावा

४. सोपविलेले कोणतेही अवघड किंवा सोपे काम मी पूर्ण करीनच असा आत्मविश्वास तुमच्या मनात निर्माण व्हायला हवा.

५. सर्वांच्या मदतीला धावून जाणे यात तुम्हाला आनंद वाटायला हवा.

६. तुमच्या सर्व परिवारात तुम्ही महत्त्वाचा माणूस व्हायला पाहिजे.

**ओरिसन स्वेट मार्टेन**

## माहे डिसेंबर, २०१२ सेवापूर्ती समारंभ

दिनांक ३१/१२/२०१२ रोजी कॅ. वडके हॉल येथे डिसेंबर, २०१२ मधील सेवानिवृत्त २९ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये १८ वयोपरत्वे व ११ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा.हनुमंत नाझीरकर, प्रकल्प संचालक, नागरवस्ती विकास योजना, श्री. प्रकाश केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली व सर्व सेवानिवृत्त सेवकांना नुतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. नाझीरकर यांनी महापालिकेची दीर्घ सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांचे महापालिकेतर्फे आभार मानले



जाधव, कार्याध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन, श्री. गोडबोले सेवानिवृत्त सेवक संघ प्रतिनिधी हे उपस्थित होते.

प्रास्ताविकात मा.नितीन व सेवानिवृत्त सेवकांनी त्यांचे आरोग्य सुस्थितीत राखण्याचे प्रयत्न करावेत, तसेच, त्यांना सेवानिवृत्तीप्रित्यर्थ मिळणाऱ्या सर्व रकमांची नियोजनबध्द गुंतवणूक करुन आपले उर्वरित आयुष्य सुखासमाधानाने व्यथित करण्याबाबत नमूद केले व सर्व सेवानिवृत्त सेवकांना भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सूर्यकांत चांदेरे, ज्युनिअर ग्रेड लेखनिक यांनी केले.


**कल्याणवार्ता**

डिसेंबर, २०१२

प्रकाशक तथा अध्यक्ष

कामगार कल्याण निधी

मा. आयुक्त,

पुणे महापालिका

❖ संपादक ❖

मा.सल्लागार (कामगार)

❖ कार्यकारी संपादक ❖

कामगार कल्याण अधिकारी

❖ सहाय्यक ❖

सौ. ज्योती अ.भोसले

❖ मुद्रक ❖

जयंत पवार

व्यवस्थापक,

मुद्रणमहर्षि मामाराव दाते मुद्रणालय, मनपा, पुणे.

❖ प्रकाशन स्थळ ❖

पुणे महापालिका

शिवाजीनगर,

पुणे ४११ ००५

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.

❖ संपर्क ❖

सल्लागार (कामगार) कार्यालय,

पुणे महानगरपालिका.

दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३

ईमेल आयडी

shivaji.daundkar@punecorporation.org


## मनन आणि चिंतन

- नावे ठेवणे सोपे पण नाव कमविणे अवघड आहे.
- प्राप्तीच्या आनंदापेक्षा प्रयत्नांचा आनंद अधिक असतो.
- चित्र ही हाताची कृती आहे, पण चरित्र ही मनाची कृती आहे.
- जीवन हे सुखाने भरलेला पेला नसून, ते कर्तव्याने भरावयाचे माप आहे.
- चांगल्या गोष्टी प्रत्येक वेळी लगेचच घडतात असे नाही. अनेकदा त्यासाठी दीर्घकाळ प्रतिक्षा करावी लागते.

## गुणवंत कामगार पुरस्कार २०११-१२

**गुणवंत कामगार पुरस्कार २०११-१२ साठी विहित नमुन्यातील अर्ज सल्लागार (कामगार) कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत संबंधित खातेप्रमुखांच्या शिफारशीसह दिनांक ३१/१/१३ अखेर पाठवावयाचे आहेत.**

## पुणे महानगरपालिकेतर्फे जागतिक एड्स दिन साजरा

दिनांक १ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था, पुणे महानगरपालिका यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, या उपक्रमांतर्गत पुणे महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, डॅफ्कु, औंध, पुणे शहरातील स्वयंसेवी संस्था, एनएसएस मॉडर्न कॉलेज, यांच्या सहकार्यातून जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली. हॉटेल गुडलक, डेक्कन जिमखाना येथे मा. श्री. विजय दहिभाते, उपायुक्त (वि.का.क्र.१) यांच्या शुभ हस्ते रॅलीचे उद्घाटन झाले.

ही रॅली फर्ग्युसन कॉलेज मार्गाने मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर, पुणे येथे संपली. या ठिकाणी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. श्री. आर.एस.झुंझारराव यांनी विद्यार्थ्यांना एड्स बाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात जॉन पॉल स्लम डेव्हपमेंट, प्रकल्प, एन.एम.पी.प्लस, कायाकल्प, उडान, हिंदुस्तान लाईफ केअर लिमिटेड, दिपगृह सोसायटी, दिशा फौंडेशन, सेवाधाम ट्रस्ट, किर्लोस्कर न्यमॅटिक कंपनी, सौदामिनी, वेक अप पुणे, समपथीक रिलीफ फौंडेशन, अमृत वाहिनी ग्राम विकास मंडळ, इत्यादी स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते सहभागी झाले.

या कार्यक्रमास पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटीचे नोडल ऑफिसर, डॉ. राजीव आर.बांबळे, श्री. पाचारणे सर अप्पासाहेब जेधे कॉलेज, श्रीमती निशा भंडारी, श्री. वराडे, एन.एस.एस.मॉडर्न कॉलेज, श्रीमती कल्याणी पाटील, डॅफ्कु, श्री. दिपक निकम, टी. आय.प्रोजेक्ट, श्रीमती सुचेता पटवर्धन, एच.एल.एल.इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या रॅलीत हत्तीवर सजावट करुन व डिस्प्ले व्हॅनद्वारा जनजागृती करण्यात आली. यामध्ये स्वयंसेवी संस्थांचा सहभाग लक्षणीय होता.

## विचारमंथन

भग्न स्वनाच्या तुकड्यांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आलेला नाही. मानवाचे मन केवळ भुतकाळाच्या साखळदंडांनी करकचून बांधून ठेवता येत नाही. त्याला भविष्याच्या गरुडपंखांचं वरदानही लाभलेलं आहे. एखादं स्वप्न पहाणं, ते फुलवणं, ते सत्यसृष्टीत उतरावं म्हणून धडपडणं, त्या धडपडीतला आनंद लुटणं आणि दुर्दैवानं ते स्वप्न जरी भंग पावलं तरी त्याच्या तुकड्यांवरुन रक्ताळलेल्या पायांनी दुसऱ्या स्वप्नामागनं धावणं, हा मानवी मनाचा धर्म आहे. मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो तो यामुळं!

**वि.सं.खांडेकर**

## खरे सुख

जीवनातील खऱ्या सुखाचे स्पष्टीकरण करताना अनेक थोर विचारवंत आणि समाजसुधारकांनी या अनुषंगाने येणाऱ्या सर्व गोष्टींचे दोन गट तयार केले आहेत. आपली कौटुंबिक व सामाजिक जबाबदारी पार पाडून इतरांना कल्याणकारी होतील अशी कामे करणे आणि दुसरा असा की ज्यामुळे मनाचे शुध्दिकरण होईल, अशी कामे करणे. स्वत:चे कल्याण हे इतरांच्या कल्याणाशिवाय पूर्ण होवू शकत नाही.

जेंव्हा जेंव्हा आयुष्यातील चढउतारांशी सामना करावा लागतो तेंव्हा देखील मन स्थिरच रहाते, शोक नाही, दुर्भावना नाही नेहमीच शांत, निर्भय, भयरहित वाटणे हेच तर सर्वोत्कृष्ट सुख आहे. काहीही घडत असो मग ते मनाच्या आतील असलेल्या विश्वाच्या सूक्ष्म प्रतिकृतीत असो, शरीरात असो किंवा बाहेरच्या जगात असो आपल्याला त्याच्याशी सामना अगदी सहज, मनात कोणत्याही प्रकारचा तणाव निर्माण न करता, राग व द्वेष येवू न देता, आंतरमनाच्या खोलीतून येणारे हास्य चेहऱ्यावर घेवून करता आला पाहिजे. प्रत्येक परिस्थितीत सुखात वा दु:खात, हवीहवीशी वा नकोशी असणारी, मनात यत्किंचितही चिंता व असुरक्षितता वाटायला नको. उलट मनात अनित्यतेच्या जाणीवेने येणारी पूर्ण सुरक्षितता पाहिजे. हाच खरा आनंद, हेच खरे सुख आहे.

## एक बिनती हे गणराज।

हे गणराज - बुध्दिप्रदायक
सद्बुध्दी हमें आज, फिर दे जाओ।
बुध्दी से बढकर, विवेक सद्बुध्दी है
ग्यान हमें यह, फिर दे जाओ
हे गणनायक - बुध्दीप्रदायक,
सद्बुध्दी हमें आज, फिर दे जाओ

धन-घर-जेवर, है हमने जोडे
गण बस हमने, है कमही जोडे
बस रिक्त पडे है, दिल ये प्यारको
प्रेम-भाव से जरा इन्हे तुम,
जीवन में. फिर से भर जाओ
हे गणनायक-बुध्दीप्रदायक,
सद्बुध्दी हमें आज, फिर दे जाओ

लालोकें पडे, बडे आकाल है
हे शंभो-नंदन, गौरी-तनया
इन माताओं के, कोखसे फिर तुम
भगत - मीरा और गौतम जन्माओं
हे गणनायक-बुध्दीप्रदायक,
सद्बुध्दी हमें आज, फिर दे जाओ

भटक रहा हर गण यहाँ है
हे सुख के कर्ता और दु:ख हरता
द्वेष - अनिती, अति तृष्णा सब,
मन से इनके, आज हर जाओ
हे गणनायक - बुध्दीप्रदायक,
सद्बुध्दी हमें आज, फिर दे जाओ

**(राजदीपबि.धुसिया)**
**उप अभियंता,**
**परवाना व आकाशचिन्ह विभाग**

## वाचकांसाठी...

- खातेप्रमुखांच्या कार्यालयाकडून दरमहा अंक उपलब्ध करुन कार्यालयाच्या दर्शनी भागावर/सूचना फलकावर लावा.
- आपला अंक वाचून झाल्यावर दुसऱ्याला वाचण्यास द्या.
- अभिप्राय व सूचना द्या.
- नवीन स्तुत्य उपक्रम/योजना/कार्यक्रम यांचे फोटोसहित संक्षिप्त वृत्त पाठवा.

# खरी करुणा

करुणा म्हणजे लोकसेवा करण्याची खरी इच्छा. इतरांच्या दु:ख मुक्तीसाठी लावलेला खरा हातभार. पण हे सर्व निरासक्त असायला हवे. जर आपण इतरांचे दु:ख पाहून स्वत:च रडायला सुरुवात केली तर आपण स्वत:लाच दु:खी करुन घेतो. जर आपल्याजवळ खरी करुणा असेल तर पूर्ण प्रेमाने, शक्तीनिशी आपण इतरांना मदत करण्याचा प्रयत्न करतो. आपण त्यात अयशस्वी झाला तर त्याचा हसत स्विकार करुन परत मदतीचा दुसरा मार्ग शोधणे शक्य होते. आपल्या सेवेचा काय परिणाम होणार आहे याची चिंता न करता आपण सेवा कराल हीच खरी करुणा आहे.

## महत्वाचे

- माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत दाखल झालेल्या प्रत्येक अर्जाची दखल घ्या
- अधिनियमातील तरतुदी नुसार विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन द्या.
- अर्ज विभागाशी संबंधित नसल्यास तो त्याच दिवशी संबंधित विभागाकडे पाठवून त्याप्रमाणे अर्जदारास लेखी कळवा.
- प्रथम अपिलांची सुनावणी विहित मुदतीत घ्या.
- अपिल प्राधिकाऱ्याच्या आदेशांची अंमलबजावणी करा.